पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८८ ■ शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -288 ■ Thursday, 7 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## यंदा 'परिक्षा पे चर्चा' सहभागासाठी ३ कोटी ५६ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी बोर्डाच्या परीक्षांपूर्वी देशभरातील विद्यार्थ्यांशी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमातून संवाद साधतात. गेल्या आठ वर्षांपासून 'परीक्षा पे चर्चा' हा उपक्रम राबवला जात आहे. त्यांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना करिअरच्या वाटेवर महत्त्वाच्या असणाऱ्या परीक्षेमधील यशासाठी तसेच तणावमुक्त राहण्यासाठी एकंदरीतच अभ्यासाच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करतात.

आता पंतप्रधान मोदींचा 'परीक्षा पे चर्चा' हा संवाद कार्यक्रम यावर्षी नवीन स्वरूपात आणि शैलीत आयोजित केला जात आहे. यावर्षी 'परीक्षा पे चर्चा'मध्ये पंतप्रधान मोदींसह बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण, बॉक्सर मेरी कोम, अवनी लेखारा, ऋजुता दिवेकर, सोनाली सभरवाल, फूडफफार्मर, विक्रांत मेस्सी, भूमी पेडणेकर, टेक्निकल गुरुजी आणि राधिका गुप्ता आदी सहभागी होत आहेत. ते विद्यार्थ्यांना टिप्स देतील. २०२५ मध्ये होणाऱ्या कार्यक्रमासाठी ३ कोटी ५६ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

**यंदा साडेतीन कोटी विद्यार्थ्यांची नोंदणी**

२०१८ मध्ये 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाची सुरुवात झाली होती. सातव्या आवृत्तीपेक्षा यंदा होणाऱ्या आठव्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या सहभागात लक्षणीय वाढ दिसून येत आहे. गेल्या वर्षी यासाठी २.२६ कोटी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. हा कार्यक्रम पहिली तीन वर्षे नवी दिल्ली येथे टाउन-हॉल इंटरॅक्टिव्ह स्वरूपात आयोजित केला होता. कोरोना काळात चौथा कार्यक्रम दूरदर्शन आणि सर्व प्रमुख टीव्ही चॅनेलवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमाच्या स्वरूपात ऑनलाइन आयोजित केला होता.

'परीक्षा पे चर्चा'चे यंदाचे आठवे वर्षे

'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाचे हे आठवे वर्षे आहे. या वर्षी तीन कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नोंदणी केली आहे. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागातर्फे दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हा कार्यक्रम नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे टाउन हॉल स्वरूपात आयोजित केला जातो.

**बांधकाम साईटवर पाळत ठेऊन पोलिसांनी केली कारवाई**

## नाशिक शहरामध्ये वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशी घुसखोरांना अटक!

**छत्रपती संभाजीनगरातही कोंबिंग ऑपरेशन केले पाहिजे**




नाशिक : नाशिक पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने अवैधरित्या घुसखोरी करून शहरामध्ये वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादशी नागरिकांना अटक केली. हे सर्व बांगलादेशी नागरिक शहरातील विविध भागातील बांधकामाच्या साइटवर आपली ओळख लपवून राहत होते.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत या घटनेची सविस्तर माहिती दिली. मध्यवर्ती गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण माळी यांना मिळालेल्या गोपनीय माहिती नंतर मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने या संशयित घुसखोर नागरिकांवर हुशारीने पाळत ठेवली होती. या कामगिरी दरम्यान गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी साईट सुपरवायझर, बांधकाम मजूर यांचे वेशांतर केले होते.

पथकाने आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका बांधकाम साइटवर जाऊन सदर बांगलादेशी घुसखोरांच्या वास्तव्याची खातरजमा केली. सदर व्यक्ती बांग्लादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न होतात तांत्रिक विश्लेषण करून आठ संशयित लोकांना ताब्यात घेण्यात आले.

सुमन कलाम गाझी (वय २७), अब्दुल्ला अलीम मंडल (३०), शाहीन माफिजुल मंडल (२३), लासेल नूर आली शंतर (२३), असाद अर्शद अली मुल्ला (३०), अलीम सुआन खान (३२), अल अमीन आमिनूर शेख (२२) व मोसिन मोफिजुल मुल्ला (२२) अशी या बांगलादेशी घुसखोरांची नावे आहेत. त्यांच्याजवळ भारतीय नागरिकत्वाचा पुरावा मागितला असता तो ते सादर करू शकले नाहीत. तसेच दोन जणांकडे आधार कार्ड मिळाले आहे. ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची अधिक चौकशी केली असता बांगलादेशातील एका व्यक्तीने त्यांना सीमापार करण्यास मदत केल्याचे सांगण्यात आले. यातील आरोपी सुमन गाझी हा सर्वप्रथम भारतात आला व त्यानंतर त्याने त्याच्या संपर्कातून उर्वरित आरोपींना भारतात आणि पुढे नाशिक मध्ये आणले.

**बांगलादेशी नागरिकत्वाचे सापडले पुरावे**

ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल, सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास चव्हाणके प्रविण माळी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेरखान पठाण, किशोर देसले, बाळु बागुल, नामदेव सोनवणे, पोलीस हवालदार गणेश वाघ, समिर चंद्रमोरे, मनिषा जाधव, वैशाली घरटे, अतुल पाटील, गौरख खांडरे, युवराज कानम हाले यांच्या पथकांनी केली. ताब्यात घेतलेल्या घुसखोरांकडे ते बांगलादेशी नागरिक असल्याचे पुरावे सापडले आहेत. बांगलादेश सरकारची अधिकृत ओळखपत्रे त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आली आहेत. ताब्यात घेतलेल्या सर्व घुसखोरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून आडगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन खैरनार पुढील तपास करीत आहेत.

## धनंजय मुंडेंचे १९९८ मध्येच झाले पहिले लग्न, करुणा शर्माच पहिली पत्नी

मुंबई : राज्याचे कॅबिनेटमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयाने निकाल दिला आहे. करुणा शर्मा ही धनंजय मुंडे यांची पहिली पत्नी आणि राजश्री ही त्यांची दुसरी पत्नी आहे. करुणा शर्मा आणि धनंजय मुंडे यांचे ९ जानेवारी १९९८ रोजी लग्न झाले होते, ही बाब सिद्ध झाल्याचे कौटुंबिक न्यायालयाने निकालात नमूद केले आहे. करुणा शर्मा आणि धनंजय मुंडे यांचे वैवाहिक आयुष्य २०१८ पर्यंत सुरळीत होते. पण नंतर धनंजय मुंडे यांनी करुणा यांच्याकडे दुर्लक्ष करण्यास सुरुवात केली; असेही कौटुंबिक न्यायालयाने निकालात नमूद केले आहे.

राजश्री यांच्याशी विवाह केल्यानंतर करुणा यांना धनंजय मुंडे यांनी ज्या प्रकराची वागणूक दिली ती अन्यायकारक आहे. करुणा शर्मा पोटगीसाठी पात्र आहेत. धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांना दरमहा एक लाख २५ हजार रुपये पोटगी म्हणून द्यावेत. तसेच मुलगी शिवानीला लग्न होईपर्यंत दरमहा ७५ हजार रुपये द्यावे, असा आदेश वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयाने दिला. अर्जदार करुणा शर्मा यांनी अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून पोटगी द्यावी, असाही आदेश कौटुंबिक न्यायालयाने धनंजय मुंडेंना दिला आहे. न्यायालयीन कारवाईसाठी झालेल्या खर्चाची भरपाई म्हणून धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांना २५ हजार रुपये द्यावे, असाही आदेश कौटुंबिक न्यायालयाने दिला आहे.

धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांचे ९ जानेवारी १९९८ रोजी लग्न झाले. हा प्रेमविवाह होता. धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांनी सहमतीने आंतरजातीय विवाह केला होता. धनंजय मुंडेंनी १८ जुलै २०१७ रोजी एका मालमत्तेच्या मालकी हक्काबाबतच्या कागदपत्रांमध्ये या संदर्भात उल्लेख केला आहे. ही बाब तसेच करुणा शर्मा यांनी सादर केलेले साक्षी - पुरावे यांची दखल घेऊन कौटुंबिक न्यायालयाने निकाल दिला आहे.

कौटुंबिक न्यायालयाचा निकाल 'एक्स'वर पोस्ट करुन अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी दोन तासांत धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे.

## भारताची 'चांद्रयान-४' मोहिम २०२७ मध्ये

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारत २०२७ मध्ये चंद्रावरील खडकांचे नमुने पृथ्वीवर परत आणण्यासाठी 'चांद्रयान-४'ही मोहिम प्रक्षेपित करेल. अशी माहिती केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी एका मुलाखतीत दिली. यासंदर्भात जितेंद्र सिंह म्हणाले की, भारत २०२६ मध्ये खोल समुद्राचा शोध घेण्यासाठी 'समुद्रयान' मोहिम देखील प्रक्षेपित करेल आणि 'गगनयान' ही मोहीम देखील भारतीय अंतराळवीरांच्या पहिल्या तुकडीसह अवकाशात झेपावेल. चांद्रयान-४ मोहिमेचे उद्दिष्ट चंद्राच्या पृष्ठभागावरून नमुने गोळा करणे आणि ते पृथ्वीवर परत आणणे आहे. यामध्ये हेवी-लिफ्ट एलव्हीएम-३ रॉकेटचे किमान २ वेगवेगळे प्रक्षेपण समाविष्ट असतील जे मोहिमेचे ५ वेगवेगळे घटक वाहून नेतील जे कक्षेत एकत्र केले जातील.

## चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला वीस वर्षाची सक्तमजुरी

परभणी : एका चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला वीस वर्षाची सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. दंडाची रक्कम पिडीतेला देण्याचे आदेश देण्यात आले. आज गुरुवारी (दि. ६) जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती के. एफ. एम. खान यांनी हा निकाल दिला. याबाबत अधिक माहिती अशी की येथून जवळच असलेल्या दैठणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०२३ यावर्षी या प्रकरणात गुन्हा नोंद झाला होता. या प्रकरणातील आरोपी स्वप्निल उर्फ राजू भगवान ताकट याने मोबाईल देऊन लहान मुलीला बाथरूममध्ये नेत अश्लील चाळे केले.

यावेळी मुलीची आजी आली असता आरोपी काहीच न बोलता निघून गेला. आजीने मुलीला घरी आणले त्यावेळी मुलीने सर्व परिस्थिती सांगितली. ती रडत होती. त्यानंतर मुलीला रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासून घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर आरोपी विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी टिप्पलवाड यांनी तपास करत दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अकरा साक्षीदार तपासण्यात आले.

पीडिता, फिर्यादी, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष या प्रकरणात महत्त्वाची ठरली. न्यायालयाने आरोपी स्वप्निल उर्फ राजू ताकट याला दहा वर्षे सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंड व आणखी एका कलमाखाली वीस वर्षे सक्तमजुरी तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. दंडाची रक्कम पिडीतेला देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सरकारी अभियोक्ता ॲड. ज्ञानोबा दराडे, सहाय्यक संचालक सुहास कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सुनंदा चावरे यांनी बाजू मांडली.

## महायुतीच्या बातम्या नीट द्या नाहीतर:, हातात AK47 घेत अजित पवारांची मिश्किल टिप्पणी

**पुणे :**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बैठक असो, सभा असो की पत्रकार परिषद ते कायम स्पष्टपणे आणि मिश्किलपणेही बोलताना अनेकवेळा पाहिले आहे. मागे त्यांच्या काही विधानांमुळे वादही निर्माण झाले होते. आता आज पुण्यातील चाकणमध्ये अजित पवारांनी केलेली एक मिश्किल टिप्पणी राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे.



**नेमकं काय म्हणाले अजित पवार?**

पिंपरी चिंचवडमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन झाले. यानंतर त्यांनी चाकणच्या निबे उद्योग समूहाला भेट दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांनी हातामध्ये एके ४७ बंदूका घेतल्याचे पाहायला मिळाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नेम लावण्याचा प्रयत्न केला. तर अजित पवारांनी उपस्थित पत्रकारांवर बंदूक रोखत महायुतीच्या बातम्या नीट द्या नाहीतर बघाङ्ग, असे विधान केले अनब उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. ते पुढे म्हणाले की, आम्ही दोघं तर सगळ्यांना उडवून टाकू. त्यांनी पुढे असेही म्हटले की, आता एवढंच छापतील.

**सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल**

सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हातात एके४७ घेतल्याचे दिसत आहे. या व्हिडिओमध्ये कॅबिनेट मंत्री उदय सामंत आणि कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटीलही दिसत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यातील चाकण येथे 'निबे लिमिटेड' प्रकल्पातील अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, शस्त्र, व सरंक्षण सामग्रीची पाहणी केली. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निबे लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, निबे डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस लि. चे संचालक प्रकाश भामरे आदी उपस्थित होते.

## आता गाड्यांची तोडफफोड कराल तर तुरुंगातच सडावे लागेल; संबंधितांना मोक्का लावण्याचे अजित पवारांचे आदेश

पुणे : पुण्यात सातत्याने गाड्यांची तोडफोडीच्या घटना ऐकायला मिळत आहेत. त्याचबरोबर कोयते घेऊन दहशत पसरवणारी गँग देखील थांबायचे नाव घेत नाही. यावर आता शेवटचा उपाय म्हणून पालकमंत्री अजित पवार यांनी पोलीस आयुक्तांना महत्वाचे आदेश दिले आहेत. या तोडफफोड गँगला जामीनच मिळणार नाही, असे मोक्काचे कलम लावा, असे स्पष्टपणे सांगितले आहे. पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरु असलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.



वारंवार तोडफफोडीच्या घटना घडत असताना त्यावर कुठलेही नियंत्रण येत नसल्याने अजित पवारांनी थेट पोलीस आयुक्तांवरच प्रश्नांची सरबत्ती केली. बिबवेवाडी परिसरात मध्यरात्री काही गुंड प्रवृत्तीच्या तरुणांनी केलेल्या गाड्यांच्या तोडफफोडप्रकरणाची पवारांनी दखल घेतली. कोयता गँग, तोडफफोड करणाऱ्यांचा बंदोबस्त करा. त्यांच्यावर मोक्का लावा. आरोपींना पकडल्यानंतर त्यांची अशी धिंड काढा की शहराला कळाले पाहिजे की चुकल्यानंतर कायदा कसा असतो. या कार्यक्रमात पुण्याचे पोलीस आयुक्त हवे होते, त्यांना पण सुनावले असते, अशा शब्दांत पवारांनी मुख्यमंत्र्यांसमोरच पुणे पोलीस आयुक्तांना इशारा दिला.

# अनर्थ टळत का नाहीत?

भारतामध्ये मोठ्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये गर्दी मोठ्या प्रमाणावर होते आणि या गर्दीवर योग्य नियंत्रण ठेवले गेले नाही, तर चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना घडतात, ही बाब आता नवीन राहिलेली नाही. गेल्या काही वर्षांत भारतामध्ये अनेक ठिकाणी चेंगराचेंगरीच्या भीषण घटना घडल्या आहेत आणि त्या आयोजकांसाठी, प्रशासनासाठी आणि नागरिकांसाठी धडा ठरल्या आहेत. १९५४ च्या कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीत झालेला ८०० हून अधिक लोकांचा मृत्यू, २००५ मधील महाराष्ट्रातील मांढरदेवी दुर्घटना, २०११ मधील साबरीमाला मंदिरातील मकरविलक्कू उत्सवावेळी परतीच्या मार्गावर गोंधळ उडून झालेली चेंगराचेंगरी, २०१३ मध्ये मध्य प्रदेशातील रतनगड मंदिरात दुर्गापूजा उत्सवावेळी अफवेमुळे उडालेला गोंधळ, २०२२ मध्ये वैष्णोदेवी मंदिरात झालेली दुर्घटना अशा अनेक दुर्घटनांचा खेदजनक इतिहास आपल्या गाठीशी आहे. दरवेळी अशा दुर्घटना घडल्यानंतर त्याचा तपास करण्यासाठी चौकशी समित्या स्थापन होतात, त्या अहवाल सादर करतात. त्यातून गर्दी नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वे पुढे येतात. परंतु त्याची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यामुळे पुन्हा दुर्घटना घडत राहतात. प्रयागराजमधील ताज्या घटनेने या मालिकेत नवे पुष्प जोडले गेले आहे.

चाळीस दिवस चालणाऱ्या महाकुंभमेळ्याला निम्मे दिवसही झाले नाही तोवर तेथे दुर्घटना घडली. अर्थात उसळणारी गर्दी पाहाता अशा प्रकारची घटना घडण्याची भीती सतत वाटतच होती. प्रयागराजच्या कुंभमेळ्याची जबाबदारी उत्तर प्रदेशात सत्तेत असणाऱ्या योगी आदित्यनाथ यांच्या सरकारवर आहे. सरकारने व्यापक प्रमाणात सुरक्षा व्यवस्था आणि भाविकांना सुविधा उपलब्ध करून दिल्याचा दावा केला आहे. परंतु प्रचंड गर्दी, ढिसाळ व्यवस्थापनामुळे मौनी अमावास्येला संकट टाळता आले नाही.
दहा-बारा दिवसांपूर्वी गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन महाकुंभातील तंबूंना आग लागण्याची घटना घडली होती. त्यानंतर आयोजक अधिक सतर्क झाल्याचे सांगितले जात होते. परंतु आताच्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेमुळे आयोजनात उणिवा राहिल्या हे स्पष्ट झाले. एक महत्त्वाची बाब म्हणजे, अशा प्रकारच्या घटनेला कोणा एकाला जबाबदार धरता येणार नाही. कारण लहान सहान चुकांची जेव्हा गोळाबेरीज होते तेव्हा अशा प्रकारच्या घटनेला सामोरे जावे लागते. कुंभमेळ्यात घडलेली ही पहिली दुर्घटना नाहीये. १९५४ मध्ये प्रयागराज, २०१३ मध्ये प्रयागराज, २०१० मध्ये हरिद्वार, २००३ मध्ये नाशिक, १९९२ मध्ये उज्जैन या ठिकाणी झालेल्या कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी, पळापळ होऊन अनेकांचा मृत्यू झाला आणि जखमी देखील झाले. २०२५ चा महाकुंभमेळा वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे सोशल मीडियावर व्हायरल झाले. १४४ वर्षांनंतर शुभयोग आल्याने या कुंभमेळ्याला आणखीच महत्त्व आले. कुंभमेळ्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे, धार्मिक विधी करण्यासाठी गर्दी होत आहे, हे लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर निधी खर्चून आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत आयोजन करण्यात आले.
वस्तुतः या दुर्घटनेमागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे अमृतस्नानासाठी एकाचवेळी जमणे.
मनातील आध्यात्मिक श्रद्धा आणि गंगामातेवरची निस्सिम भक्ती बाळगत कोट्यवधी भाविक देशातून, जगभरातून प्रयागराजकडे मार्गस्थ झाले. कुंभमेळ्यात येण्यासाठी भाविकांना प्रोत्साहन मिळत गेले आणि पाहाता पाहाता गर्दी वाढत गेली. कुंभमेळ्यात ४५ ते ५० कोटीपर्यंतची गर्दी येण्याचा नुसताच अंदाज वर्तविला नाही तर तेवढी गर्दी होणार असल्याचे गृहीत धरून तयारी करण्यात आल्याचे सांगितले गेले. देशभरातून विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात आल्या. बसची शटल सेवा सुरू करण्यात आली. विमान उड्डाणांची संख्या देखील वाढवण्यात आली. व्यवस्थेबाबत करण्यात येणारे दावे, मोठी प्रसिद्धी आणि सोशल मीडियामुळे कुंभमेळ्याच्या प्रसिद्धीने कळस गाठला आणि प्रत्येक जण एकदातरी कुंभमध्ये जाण्यास सज्ज झाला. नवीन परंपरा, प्रथा आणत पहिल्यांदाच देशभरात राज्य सरकारांना कुंभमेळ्याचे निमंत्रण देण्यात आले. एकार्थाने लोकांना कुंभमेळ्यात पाठविण्यासाठी सर्वजण एकत्र प्रयत्न करू लागले. पण यातून लोकांचा ओघ वाढतच गेला आणि मौनी अमावास्येच्या पहाटे अप्रिय घटना घडली. वास्तविक, संगमापर्यंत जाण्याचा एक मार्ग आणि परतीचे तीन मार्ग अक्षयवट मार्ग, महावीर मार्ग आणि जगदीश रॅम्प निश्चित केले होते. आणीबाणीसाठी ग्रीन कॉरिडॉर देखील तयार केला होता.
मौनीच्या दिवशी सर्वांनाच अमृतस्नान करायचे असल्याने भाविकांना आदल्यादिवशी रात्री बॅरिकेडजवळ आणि गंगानदीच्या किनाऱ्यावर थांबण्याशिवाय पर्याय नव्हता. किनाऱ्याला जोडणारे पूलही बंद केले होते. अर्थात व्हीआयपी मंडळीसाठी जशी व्यवस्था केली जाते, तशी व्यवस्था सामान्यांसाठी कधीच नसते आणि या कुंभमेळ्यातही दिसली नाही. पण संगमावर प्रचंड गर्दी उसळण्याचा अंदाज असताना तेथे भाविकांना का जाऊ दिले? असा प्रश्न आहे. घाटांजवळील थांबण्याच्या ठिकाणच्या परिस्थितीची सरकारने योग्यपणे हाताळणी का केली नाही?

# माता रमाईच्या त्यागाला सलाम

कोटीची माता त्यागमूर्ती रमाईचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी दापोली जिल्ह्यातील छोट्याशा वणंदगावात अत्यंत गरीब महार कुटुंबात झाला.आईवडिल वारल्याने छोट्या तीन भांवडणा सांभाळण्याची जबाबदारी रमाईवर आली. मामा त्या सर्वांना मुंबईला घेवून आले. परस्थितीने इतकं शहाणपण आल की ' आयुष्याशी रडण्याचा नव्हे तर लढण्याचा निर्धार केलेली रमा बालवयातच मोठ्या माणसा सारखे वागू लागली.हुशार,समजुदार प्रेमळ आणि धाडसी रमा सर्वांना आवडणारी होती.

सुभेदार रामजी बाबांनी तर रमाला पहिल्याच भेटीत पाहताच क्षणी आपली सून करण्याचे निश्चित केले. ' हिऱ्याची खरी पारख जव्हारीच करू शकतो. त्यांना माहीत होते की, माझा भिवा जगाला प्रकाशित करणारा तळपता प्रज्ञासूर्य आहे. त्याचा सहवास आणि त्यांच्या संसाराची दाहकता फक्त रमाच सहन करू शकते. अगोदर एका मुलीशी भिवाचे करण्याचे निश्चित झाले असताना त्यांनी लग्न मोडले. त्यासाठी

जातपंचायतला पाच आने दंड देखील भरला.१४ डिसेंबर १९०७ साली मुंबई भायखळा मंडईत विवाह झाला. त्यावेळी रमाई ९ वर्षाची तर भीमराव १४ वर्षाचे होते.ग्रहप्रवेश करून घरी आलेल्या सुनेला रामजीबाबा म्हणाले ' रमा मी तुझी एका धगधगत्या सूर्याशी संसार गाठ बांधली असून माझा भिवा हा जगाचा प्रज्ञासूर्य होण्यास त्याच्या शिक्षणात खंड पडू देऊ नकोस. त्यासाठी तुला तुझ्या सर्वस्वाचा त्याग करून त्याची सदैव सावली बनून राहिली पाहिजेस

९ वर्षाच्या रमाला एव्हढ्या मोठ्या शब्दाचा अर्थ कळला नसला तरी आपल्याला उच्च शिक्षण घेणारा पती मिळाल्याचा तिच्यासाठी अती उच्चतम आनंदाचा क्षण होता.

डॉ.बाबासाहेब बी ए, एम ए,पी एच डी, एम एस सी, बार अट लॉ, डी एस सी , डी लीट,अश्या अनेक डिग्री आणि अनेक भाषा अवगत करताना रमाईला २७ वर्षांच्या काळात मोठा त्याग करावा लागला.

पतीच्या शिक्षणासाठी गवऱ्या वेचून पैसा साठविला. हौसमौज न करता मन मारून काटकसरीचा संसार करताना कोटी कोटी दलितांची माता असलेल्या रमाईला मात्र गरिबी ऊपासमारी आणि डॉक्टर इलाज औषदाविना गंगाधर, राजरत्न, रमेश व इंदू (मुलगी) ही स्वतः ची चार मूळ गमवावी लागली. साहेबाच्या शिक्षणासाठी मन कठोर करून साहेबांना प्रत्येक वेळी मुलं मेल्याचे दुःख कळू दिले नाही.,त्यावेळी



रमाईचे दुःख आणि हाल पाहून कार्यकर्त्यांनी वर्गणी काढून मदतीची रक्कम देऊ करताच साहेबांना कमीपणा येऊ नये म्हणून स्वतःची चूल बंद असताना देखील रमाईनी मदत नाकारून आपल्या पेक्षा जास्त गरीब असलेल्या परिवारास मदत करण्यास सांगितले.याची आजच्या फुकट्याना जनाची नाही तर मनाची लाज वाटली पाहिजे. बडोदा संस्थानकडून लंडनला वेळेवर स्कॉलाशिप मिळत नसल्याने 'ज्ञान घेण्यासाठी वेळ नसलेले आणि जेवणासाठी पैसे नसलेल्या साहेबासाठी रमाईचा जीव कासावीस झाला. अठरा विश्व दरिद्र्याशी सामना करीत पतीच्या शिक्षणासाठी साता समुद्रापार १४ रुपयांची

मनीऑर्डर पाठविनारी रमाई ही जगाच्या इतिहासातील पहिली पत्नी असावी ?बॅरिस्टर झालेले डॉ.आंबेडकर लंडन हून येत असताना जहाज समुंद्रात बुडाल्याची बातमी आली.संपूर्ण समाज शोकाकुल झाला. परंतू त्या जहाजात त्यांची पुस्तकं होती .बॅरिस्टर डॉ.बाबासाहेब मागच्या जहाजाने येत असल्याची बातमी येताच रमाईच्या

आनंद गगनात मावेनासा झाला.त्याच्या स्वागतासाठी मुंबई बदर कडे सगळा समाज लोटला.रमाई ही घाई घाईने निघाली .पण बॅरिस्टरची बायको गळ्यात सोन्याचा फुटका मनी नाही पण चांगली साडी देखील नाही. शोधा शोध करता कोल्हापूरात शाहू महाराजानी डॉ.बाबासाहेबांना जरीचा फेटा बांधून

सत्कार केला होता. तो फेटा साडी म्हणून परिधान करून रमाई साहेबाच्या स्वागताला निघाली.लोकांच्या गराड्यात असलेल्या बाबासाहेब यांची फक्त नजरा नजर झाली.त्यावेळी दोघांच्या मनाला काय वेदना झाल्या असतील याची कल्पनाच करवत नाही.

डॉ.बाबासाहेब १६ ऑगस्ट १९२६ रोजी मित्र दत्तोबा पवार यांना संतान वियोगाचे दुः ख पत्रात लिहितात की, 'आम्ही चार सुंदर रुपवान मुलं दफन केली त्यात तीन मुलगे आणि एक मुलगी होती .मुलांच्या मृत्यूमुळे जीवनातील आनंद निघून गेला आहे . जसे बायबलमध्ये लिहिले आहे: 'तू पृथ्वीचा आनंद आहेस.' जर हे पृथ्वी त्याग असेल, तर पृथ्वी आनंदित कशी असेल? 'माझ्या परिक्त जीवनात मला पुन्हा पुन्हा असेच वाटते. पुत्रांच्या मृत्यूमुळे माझे जीवन अगदी काटेरी झुडुपेने भरलेल्या बागांसारखे आहे. आता माझे मन इतके भरून आले की मी अधिक लिहू शकत नाही.

आजारी रामुची साहेबाकडे अखेरची इच्छा होती की,मला एकदा तरी पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मणीला डोळे भरून पाहायचे आहे. परंतु डॉ.बाबसाहेब रमाईची अखेरची देखील इच्छा पूर्ण करू शकलेले नाहीत.बाबासाहेब म्हणतात की, रामू अस्पृश्यांना हिंदू मंदिरात जाण्यास बंदी असेल तर अशा मंदिरात जाऊन मोक्ष मिळणार नाही . रामू त्या पंढरपूरला लाजवेल असे मी पंढरपूर निर्माण करीन.

या पंढरपूरला लाजवेल अशी अनेक पंढरपूर निर्माण केली.आहेत.परंतु ते पाहण्यास रमाई नव्हत्या त्यानी

२७ मे १९३५ रोजी जगाचा निरोप घेतला. माझ्या शिक्षण आणि समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर फक्त दुःख आणि दुःख सहन करणारी सहचरणी सोडून गेल्याचे डॉ.बाबासाहेब यांना फार दुःख झाले .त्यानी स्वतःला घरात कोंडून घेतले.

१९४० साली 'थॉट्स ऑफ पाकिस्तान' च्या अर्पण पत्रिकेत बाबासाहेब लिहितात की , 'हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि त्या काळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिन तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.' डॉ.बाबासाहेबांच्या जीवनचरित्रात माता रमाईचे आयुष्य संघर्षमय असताना जीवनचित्रण मात्र सोशिक स्त्रीचं दाखविले जाते.रमाईच्या दुःखाची परिभाषा समजून आजच्या तरुण पिढी समोर काय आदर्श ठेवतोय ? यावर देखील विचारमंथन झाले पाहिजे. रमाई ही आता नऊ कोटीची माता नसून संपूर्ण जगाची माता बनली आहे.तिने पती , कुठूब आणि समाजासाठी केलेला त्याग हा जगातील महिलांसाठी एक आदर्श आहे. आधुनिक जमान्यात घरा घरात कणखर , धाडसी आणि लढाऊ मुलगी जन्मास येण्यासाठी रमाईची जयंती देशव्यापी नव्हे तर विश्वव्यापी जयंती साजरी झाली पाहिजे. शून्यातून विश्व निर्माण करण्याची इच्छाशक्ती असलेल्या रमाईचा आदर्श महीलात निर्माण होण्यासाठी रमाईची जयंती साजरी केली पाहिजे. दलितांची नव्हे बहुजनांची नव्हे तर जगाची माता रमाईच्या त्यागाला सलाम करताना तिची देखील डॉ.बाबासाहेब याच्या सारखीच मोठ्या प्रमाणात जयंती साजरी झाली पाहिजे.

**- वीनिती बर्फे**
सामाजिक कार्यकर्ती
९३२१७८४१४३

# राज्याच्या संरक्षण उत्पादन धोरणामुळे देशाचे खरे 'डिफेन्स क्लस्टर' हे महाराष्ट्र आणि पुण्यात

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निबे डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस लि.च्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचे उद्घाटन

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र हे पहिले असे राज्य आहे की ज्याने काळाची पावले ओळखून २०१७ साली संरक्षण उत्पादन धोरण तयार केले. आज देशाचे खरे डिफे न्स क्लस्टर हे महाराष्ट्र आणि त्यातही ते पुण्यात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया- मेक फॉर वर्ल्ड' ही घोषणा दिली आणि देशातील नवोन्मेषकांना संधी, व्यासपीठ मिळवून दिल्याने आज आपला देश संरक्षण क्षेत्रात श्रेष्ठत्वाकडे वाटचाल करत आहे, असेही ते म्हणाले.

चाकण औद्योगिक क्षेत्रांतर्गत नानेकरवाडी येथील निबे डिफफेन्स ॲण्ड एरोस्पेस लि.च्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचे उद्घाटन आणि स्थापना दिन सोहळा तसेच कंपनीच्या शिर्डी सुविधेच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, आमदार महेश लांडगे, निबे लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, एल अँड टी डिफफेन्सचे कार्यकारी उपाध्यक्ष अरुण रामचंदाणी उपस्थित होते.

आपल्या देशात नवोन्मेषकांची कधीच कमतरता नव्हती, मात्र त्यांना संधी, व्यासपीठ मिळत नव्हते, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री मोदी यांनी 'मेक इन इंडिया- मेक फॉर वर्ल्ड ही घोषणा केली. संरक्षण उत्पादन आणि तंत्रज्ञानाच्या बळावळ श्रेष्ठत्व असलेल्या अमेरिकेसह जगातील श्रीमंत देशांच्या श्रीमंतीच्या पाठीशी त्यांचे संरक्षण उत्पादन आहे. संरक्षण उत्पादनांच्या बाबतीत आपला देश दुर्दैवाने मागे राहिला. आपण अनेक शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्या सुरू केल्या. त्यांनी निश्चितच चांगले काम केले. मात्र, यामध्ये जी अत्याधुनिकतेकडे, तंत्रज्ञानाधारित युद्धपद्धतीकडे (टेक्नॉलॉजिकल वॉरफेअर) वाटचाल होणे आवश्यक होते, ते झाले नाही. ते काम मोदी यांच्या काळात झाले.

आगामी काळ हा टेक्नॉलॉजिकल वॉरफेअरचा असून या मध्ये भारताला श्रेष्ठत्व मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री मोदी यांनी, ज्या देशांकडून संरक्षण उत्पादने आयात करण्यात येतील त्यातील काही भाग त्यांनी भारतातच तयार करावेत अशी अट ठेवली. या अटीमुळे आयात होणाऱ संरक्षण उत्पादनांचे काही भाग आपल्या देशातच तयार व्हायला सुरुवात झाली. २०१६ साली माझगाव डॉक येथे एका पाणबुडीचे जलावतरण झाले होते ती १०० टक्के आयातीत भागांवर होती. मात्र नुकतेच प्रधानमंत्री यांच्या हस्ते जलावतरण झालेल्या पाणबुडीचे ६० टक्क्याहून अधिक भाग हे भारतात तयार करू शकलो आहोत. यापूर्वी या पाणबुडीसाठी चार पट अधिक खर्च करत होतो. यामुळे एक मोठी परिसंस्था (इकोसिस्टीम) आपल्या देशात तयार झाली आहे. यापूर्वी संपूर्ण संरक्षण उत्पादनांचे आयात करणारा आपला देश आज २५ हजार कोटी रुपयांची निर्यात करत आहे. आज मोठे काम या क्षेत्रात देशात होत आहे. महाराष्ट्राने २०१७ साली संरक्षण उत्पादन धोरण तयार करुन त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी अंतर्गत निधी (फंड ऑफ फंड) स्थापन केला. त्यामुळे संरक्षण क्षेत्रातील ३०० स्टार्टअप सुरू झाले. आज पुणे नागपूर आदी ठिकाणी संरक्षण उत्पादन होत आहे. आपला देश यापूर्वी संरक्षण साधनांसाठी याचक होता; मात्र आज श्रेष्ठ असून अचूक पद्धतीने विविध संरक्षण उत्पादने तयार करीत आहे. शत्रूदेशावर अचूक मारा करण्याच्या दृष्टीने आज मार्गदर्शित क्षेपणास्त्राचा (गायडेड मिसाइल) जवळपास दोन हजार किलोमीटरची पल्ला गाठण्याकडे आपला प्रवास सुरू असून संरक्षण क्षेत्रात जगातील प्रगत देशांमध्ये आपला समावेश होत आहे. संरक्षण क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीचे श्रेय नीबेसारख्या लोकांना जाते, त्यांनी संशोधन केले, एल अँड टी सारख्या कंपनीने त्यांच्यावर विश्वस दाखविला, असेही ते म्हणाले.

ज्याला नाविन्यता समजते आणि दूरदृष्टी असते तो व्यक्ती साधने नसली तरी तो यशस्वी होतो, असे सांगून श्री. फडणवीस यांनी एका मराठी तरुणाने एक स्वप्न पाहिले आणि कर्तृत्वाच्या जोरावर ते पूर्ण केले या शब्दात गणेश निबे यांचे अभिनंदन केले. याही वर्षी गतवर्षीपेक्षा मोठ्या स्वरूपातील डिफफेन्स एक्स्पो करण्यात येईल अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

शासकीय कंपन्यांच्या बरोबरीने खाजगी क्षेत्रानेही देशाच्या संरक्षणसिद्धतेत योगदान द्यावे - अजित पवार

श्री. पवार म्हणाले, येणाऱ्या काळात होणारी युद्ध, जमिनीवर होतीलच, त्याचबरोबरीने आकाशात, पाण्यात, अंतराळात, इंटरनेट, मोबाईलच्या माध्यमातूनही होतील. त्यादृष्टीनेही आपली संरक्षणसिद्धता असण्याची गरज आहे. त्यासाठी शासकीय कंपन्यांच्या बरोबरीने खाजगी क्षेत्रानेही देशाच्या संरक्षणसिद्धतेत योगदान द्यावे, महत्वाची भूमिका बजावावी, असा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी नीबे कंपनीसारख्या संस्थांचे कार्य, मदत, भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

गणेश निबे यांच्या नेतृत्वाखाली २०२१ मध्ये स्थापन झालेल्या निबे लिमिटेडनं अवघ्या पाच वर्षात केलेला प्रवास निश्चितच कौतुकास्पद आणि अभिमानस्पद आहे. श्री. निबे यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातून पुढे येऊन काम करणाऱ्या तरुणाला मदत करण्याचा आनंद वेगळाच असतो. सतत काहीतरी नवीन करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आत्मनिर्भर भारत आणि मेक इनब इंडियाचं उद्दीष्ट समोर ठेवून, देशाला संरक्षणसिद्धतेकडे नेण्याच्या त्यांच्या प्रयत्नाबद्दल त्यांचे कौतुक करतो, असेही श्री. पवार म्हणाले. गेल्या काही वर्षात देशाच्या संरक्षणसामग्री निर्मिती उद्योगात अमूलाग्र बदल झाले. परदेशातून आयात होणारी संरक्षण सामग्री महाग असते. कधीकधी त्यांचा दर्जा कमी असतो. या सगळ्या संकटांवर मात करण्यासाठी, डीआरडीओ सारख्या शासकीय संस्थांच्या बरोबरीने संरक्षण सामग्री निर्मितीत खाजगी क्षेत्राचे सहकार्य घेण्यात येत आहे. दारुगोळा, लष्करासाठी आवश्यक पुलाचे यंत्र, अत्याधुनिक रायफल आदी अनेक शस्त्र स्वदेशात तयार होत असल्याने त्याचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचत आहे. देशाची संरक्षणसिद्धता वाढवताना, देशाला संरक्षणाच्या क्षेत्रात आत्मनिर्भर बनवताना, आयात कमी करुन,संरक्षण सामग्रीची निर्यात वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा, देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहाचवण्याचे प्रधानमंत्र्यांचे स्वप्न साकार करायचे आहे.गेल्या आर्थिक वर्षात देशानं ८५ हून अधिक देशात, २१०.८ अब्ज रुपयांची निर्यात केली. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात, संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेला (डिआरडीओ) २.९ अब्ज अमेरिकन डॉलर्स मिळाले. २०२८-२९ पर्यंत, ५०० अब्ज रुपये म्हणजे ६ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या वार्षिक संरक्षण निर्यातीचं लक्ष्य आहे.

येणाऱ्या काळात, देशाचा अभिमान, स्वाभीमान असलेल्या, डीआरडीओ, इस्रो, माझगाव डॉक, भारत इलेक्ट्रॉनिक्स, भारत इलेक्ट्रिकल्स, भारत डायनॅमिक्स, कोल इंडिया, एचएएल, आयडीया फोर्ज, ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लॅबोरेटरी या कंपन्यांच्या यादीत 'निबे लिमिडेट' कंपनीचे, 'निबे' उद्योगसमुहाचे नावही ठळकपणे असेल यासाठी त्यांनी कंपनीला शुभेच्छा दिल्या.

उद्योगमंत्री सामंत म्हणाले, गतवर्षी निबे यांनी पुणे येथे डिफफेन्स एक्स्पो घेण्यात पुढाकार घेतला. त्याची नोंद जागतिक पातळीवर घेतली गेली. श्री. निबे यांच्यासारखा मराठी माणूस संरक्षण क्षेत्रामध्ये देशाचे नेतृत्व करतो आहे याचा मनापासून आनंद होत आहे. त्यांना राज्याच्या उद्योग विभागाकडून जे जे सहकार्य लागेल ते देण्याचे काम केले जाईल. महाराष्ट्राच्या उद्योग जगतातील असेट अशा शब्दात श्री. निबे यांचा त्यांनी गौरव केला.

प्रास्ताविकात श्री. निबे यांनी आपल्या कंपनीविषयी माहिती दिली. कंपनी संरक्षण क्षेत्र, अवकाश, सायबर आदी क्षेत्रात काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य तंत्रज्ञान अधिकारी बालकृष्णन स्वामी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे कंपनीच्या प्रवासाची माहिती दिली. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनीदेखील यावेळी म नोगत व्यक्त केले. कार्यक्रमात निबे डिफफेन्स ॲण्ड एरोस्पेस लि.चे डिआरडीओशी तंत्रज्ञान आदानप्रदान करार, प्रिमीअर एक्प्लोजिव्हस, महाराष्ट्र सरकारचे एमआरसॅक, थॅलेस ॲलेनिया स्पेस, ब्लॅक स्काय या कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अन्य मान्यवरांनी प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी अनबलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, निबे लि. चे अकार्यकारी स्वतंत्र संचालक सुनील भोकरे, रंजना मिमानी, डॉ. दशरथ राम,

# उजनी धरणात वाळू माफियांवर मोठी कारवाई: चार बोटी फोडल्या

इंदापूर : उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये इंदापूर तालुक्याच्या हद्दीमध्ये गेले अनेक दिवस वाळूची मोठी तस्करी सुरू असून या वाळू तस्करांवर कारवाई करता- करता प्रशासनास नाकी नऊ आले आहेत . या महिन्यात इंदापूर तहसील कार्यालयाचे तहसीलदार जीवन बनसोडे व इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी संयुक्तरित्या तिसऱ्यांदा उजनी जलाशयात चालणाऱ्या वाळू तस्करीतील बोटी फोडून कारवाई केली.

वारंवार बोटी फोडून कारवाई केली तरी वाळूची तस्करी चालतेच कशी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे .वाळू तस्करांवर वारंवार पोलीस प्रशासन व तहसील कार्यालयातील मनुष्यबळ वापरात येत असल्याने तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन मधील त्या कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामकाजावर मोठा ताण येत असून त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. वाळू माफियांवर कठोर कारवाई करण्यासाठी धोरणात्मक निर्णय व पाऊल उचलण्याची गरज असल्याचे मत जनतेतून व्यक्त होत आहे . अनेक वेळा कारवाई करून वाळू माफीयांच्या बोटी फोडल्या तरी पुन्हा एकाच दिवसात तशीच यंत्रणा उजनी धरणांमध्ये उभे राहते. याचा प्रत्यय याच महिन्यामध्ये इंदापूरकरांना आला.

या महिन्यांमध्ये प्रशासनाच्या वतीने सलग तिसऱ्यांदा कारवाई करून दहा-बारा बोटी फोडल्या. मात्र पुन्हा- पुन्हा हे वाळू माफीये आपले डोके वर काढून आपला मूळ धंदा सुरूच करत असल्याचे चित्र उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये वारंवार दिसते. उजनी धरणामध्ये गेल्या ४५ वर्षापासून साचलेला व कोट्यावधी रुपयांचा शासनाला महसूल मिळवून देणारा मोठा वाळूचा साठा उपलब्ध आहे . मात्र शासन स्तरावर उजनीतील वाळूच्या बाबतीमध्ये अनेक वेळा चर्चा झाली धोरणही ठरले. मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप पर्यंत न झाल्याने वाळू माफियांना रात्रंदिवस व वाळूची तस्करी करण्याची मोठी संधी मिळाल्याने कोणत्याही ठिकाणी वाळू माफियांना बोटीद्वारे वाळू काढण्यास अडचण येत नाही .काळीभोर चांगल्या प्रतीची वाळू उजनी धरणांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये असून या काळ्या सोन्यावर वाळू माफिया नेहमीच डल्ला मारत आहेत. शासनाचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होत असून पर्यावरणाला ही मोठी हानी पोहोचत आहे.

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये अनेक स्थलांतर पक्षी विणीच्या हंगामासाठी येतात. उजनी धरणाच्या पाण्यामध्ये स्थलांतरित पक्ष्यांचा सर्वत्र अधिवास असतो .मात्र या वाळू माफियांना त्याचे ना सोयर ना सुतक. त्यांच्या अकराळ- विक्राळ बोटी रात्रंदिवस उजनी धरणामध्ये अवैधरित्या वाळूची तस्करी करताना दिसून येतात. प्रशासनाकडुन सातत्याने बोटी फोडून कारवाई केली जाते. मात्र कोणत्याही वाळू तस्करावर अद्यापही जरब बसवण्याइतपत कारवाई झालेली आढळून येत नाही. आज पर्यंत वाळू माफियांच्या जप्त केलेल्या वाळूच्या साठ्याचा खच तहसील कार्यालयाच्या आवारात पडला असून ठिकठिकाणी अजूनही उजनी धरणाच्या कडेला वाळूचे साठे असण्याची शक्यता आहे.

आज जिल्हा प्रशासनाच्या मदतीने इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे व इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या संयुक्त पथकाने उजनी जलाशयात इंदापूर तालुक्यातील सरडेवाडी व वनगळी येथे पाठलाग करून वाळू माफियांच्या चार बोटी पकडल्या व त्या सर्व बोटी स्फोट घडवून बुडवून नष्ट केल्या. सदर कारवाई मध्ये इंदापूरचे निवासी नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, इंदापूर मंडळ अधिकारी श्याम झोडगे, माळवाडी मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, काठी मंडल अधिकारी मल्लाप्पा ढाणे, ग्राम महसूल अधिकारी अशोक पोळ, संदीप मैलागिर, प्रताप गायकवाड, राजाभाऊ पिसाळ, अमोल हजगुडे , भास्कर घोळवे, तहसील शिपाई संग्राम बंडगर, पोलीस पाटील सुनील राऊत, प्रदीप भोई, अरुण कांबळे , विजयकुमार करे व आप्पा गायकवाड तसेच पोलीस कर्मचारी लक्ष्मण सूर्यवंशी व नंदू जाधव, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथील ड्रोण सर्वेअर संकेत बाबर व बबलू नरळे यांनी भाग घेतला.

# क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचं निधन

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

क्रिकेट समीक्षक, लेखक, मुक्त पत्रकार द्वारकानाथ संझगिरी यांचे ७४ व्या वर्षी मुंबईच्या लीलावती रुग्णालयात निधन झाले. मागील काही दिवसांपासून आजारी असलेल्या द्वारकानाथ संझगिरी यांच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारांदरम्यान गुरुवारी सकाळी संझगिरी यांची प्राणज्योत मालवली. संझगिरींच्या पार्थिवावर शुक्रवार ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

द्वारकानाथ संझगिरींचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी दादरच्या हिंदू कॉलनीत झाला. किंग जॉर्ज स्कूल (आताचे राजा शिवाजी विद्यालय) आणि रामनारायण रुईया महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. नंतर त्यांनी व्हीजेटीआय (वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट, पूर्वीची व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट), माटुंगा येथून सिव्हिल इंजिनिअरिंग केले. मुंबई महानगरपालिकेत अभियंता म्हणून नोकरी करणाऱ्या द्वारकानाथ संझगिरींना क्रिकेट प्रचंड आवडत होते.



संझगिरी मुख्य अभियंता, पाणीपुरवठा प्रकल्प म्हणून सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी स्तंभलेखक, लेखक आणि सूत्रसंचालक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. संझगिरींनी १९७० च्या उत्तरार्धात क्रीडा विषयक लिखाण सुरू केले. 'दिनांक', 'श्री' मध्ये लिहून कारकिर्दीचा श्रीगणेशा करणाऱ्या संझगिरींनी भारताने इंग्लंडमध्ये १९८३चा विश्वचषक जिंकल्यानंतर निवडक मित्रांच्या सहकार्याने 'एकच षटकार' हे पाक्षिक क्रीडा मासिक सुरू केले. द्वारकानाथ संझगिरी हे 'एकच षटकार'चे कार्यकारी संपादक म्हणून काम करत होते. संझगिरींनी १९८० च्या दशकात 'आज दिनांक', 'सांझ लोकसत्ता', 'मिड-डे', 'तरुण भारत', 'पुढारी' आणि इतर अनेक प्रकाशनांसाठी स्तंभलेखन करायला सुरुवात केली. लोकसत्तामधील त्यांचे क्रीडा लेख आणि प्रवासवर्णनसंबंधीत स्तंभ गाजले. संझगिरी हे २५ वर्षांहून अधिक काळ 'सामना' या मराठी वृत्तपत्रासाठी क्रिकेट वृत्तांकन करत होते. त्यांनी अनेक क्रिकेट सामन्यांचे कव्हरेज केले. स्तंभलेखनाव्यतिरिक्त, संझगिरी यांनी प्रवास, सामाजिक समस्या, क्रीडा आणि चित्रपट अशा विविध विषयांवर ४० पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी एक एकपात्री स्टँडअप टॉक शो पण केला. या शो चे देशाविदेशात हजारो प्रयोग झाले.


सुनील गावसकर आणि गुंडप्पा विश्वनाथ यांचा त्यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त सत्कार, सचिन तेंडुलकरांच्या विक्रमी ३५व्या कसोटी शतकानिमीत्त त्यांचा सत्कार, १९७१ च्या इंग्लिश मालिका विजेत्या भारतीय संघाचा सत्कार आणि सचिन तेंडुलकरांचा सर्वात अलीकडचा त्यांची पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार अशा अनेक मोठ्या कार्यक्रमांची संकल्पना आणि अंमलबजावणीही त्यांनी केली आहे. 'बोलंदाजी' या टीव्हीवरील कार्यक्रमाचे ते प्रस्तुतकर्ता होते. 'मधु इथे अनब चंद्र तिथे' या टीव्ही मालिकेचे ते पटकथा लेखक होते. क्रिकेट विश्लेषक आणि तज्ज्ञ म्हणून त्यांनी मराठी वृत्त वाहिन्यांसाठी काम केले. द्वारकानाथ संझगिरी २००४ पासून 'ती रा की ट धा' आणि 'स्वरा आर्ट्स' या संस्थांनी सादर केलेल्या संगीतमय कार्यक्रमांसाठी सूत्रसंचालन करत होते. या संगीतमय कार्यक्रमांमध्ये हिंदी चित्रपट आणि संगीत उद्योगातील दिग्गजांना संगीतमय श्रद्धांजली दिली जात होती.

# राजाबाजार जैन मंदिराचा ४६ व्या वर्धापन दिवसानिमीत्त ८ व ९ फेब्रुवारी विविध धार्मिक काक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार चा ४६ वा वर्धापन दिन ९ फेब्रुवारी २०२५ रोजी या दिवशी सकाळी ८.०० वाजता सर्वप्रथम पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण होवुन कार्यकमाची सुरवात करण्यात येणार आहे .तसेच ८.१५ वाजता णमोकार भक्ती मंडळाच्या साग्र संगीतामध्ये भगवान शांतीनाथाचा पंचामृत अभिषेक होणार आहे. दुपारी १ ते ५ दरम्यान शहरातील विविध महिला मडळाचा वतीने संगीतमय शांती विधान, आयोजीत करण्यात आले आहे. संध्याकाळी ७ वाजता महाआरती करण्यात येणार आहे .तसेच वर्धापन दिवसा निमीत्त प्रसादी वाटप धरमचंद,धिरज,चेतन चिराग,पाटणी,परिवार बालाजीनगर व राजाभाउफ पहाडे यांच्या वतीने देण्यात येणार आहे. वर्धापन दिवासांच्या पुर्व संधेला दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सायकाळी शिकर मदिरावर नमोकार भक्तीमडळाचा साग्रसंगीता भव्य भजन संध्याचे आयोजन केले असून याच वेळी सी.ए. विदयार्थ्याचा सत्कार समारोह व गुनगान समारोह संध्याकाळी ७ वाजता आयोजीत करण्यात आला आहे.

वर्धापन दिनानिमीत्त मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात येणार आहे. खंडेलवाल दिगंबर जैन मंदिरात ९ फेब्रुवारी १९७९ रोजी भगवान शांतीनाथाची भव्य प्रतिमा मुनिश्री सिध्दसेन महाराजांच्या सानिध्यात प्रतिष्ठापित करण्यात आली होती.तेव्हापासुन औरंगाबाद येथील खंडेलवाल दिंगबर जैन समाजाची नेत्रदिपक प्रगती झाली.आज हा समाज आदर्श समाज म्हणुन ओळखला जातो.संपुर्ण भारतामध्ये औरंगाबाद येथील जैन समाजाची एक आगळी वेगळी प्रतिमा समोर येते.अशा या चमत्कारीक शांतीनाथ भगवंताच्या प्रतिमेचे दर्शन घेतांना मनामध्ये शांती व अलौकिक असा प्रकाश होतो.अशी या मंदिराची ख्याती आहे.



तरी समाज बांधवांनी वर्धापन दिवसाव्या कार्यकमाला उपस्थित राहुन धर्मलाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष महावीर पाटणी व सचिव प्रकाश अजमेरा व विश्वस्थ मंडळाने यांनी केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी केले आहे.

# मजलीस ए तरबियती व तंजीमी कार्यक्रम संपन्न



**जिंतूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

औरंगाबाद युनुस कॉलोनी येथे मजलीस ए तरबियती व तंजीमी कार्यक्रम करण्यात आले, मजलीस ए आलेमात साउथ महाराष्ट्र ०२ फेब्रुवारी २०२५ रविवार एक दिवशी कार्यक्रम घेन्यात आले हां कार्यक्रम साउथ महाराष्ट्र चे १४ ठिकाने चे २०० अलेमा महीला आलेले होते, हा कार्यक्रम मजलीसे आलेमात संघटनेचे झालेले कामेची चर्चा झाली, हा कार्यक्रमात कुटुंबाचे व मुला, मुलीची परवरिश कशी करायची याची सगळी माहिती हा संघटनेचा तर्फे देण्यात आली. या कार्यक्रमात आयोजक म्हणून आलिया उकाशा मॅडम व डॉक्टर मुब्बाशिरा फिरदोस खान, यांनी केली, यावेळी जोहरा जबिन, फहेमीदा फिरदौस बाजी, साजिदा परवीन बाजी, जबिन बाजी व ईतर महिला उपस्थित होते...

# खिर्डीचे सरपंच ज्ञानेश्वर मतकर यांचे सरपंच पद फेरचौकशीनंर पुन्हा रद्द

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील- खिर्डी येथील ज्ञानेश्वर मातकर सरपंचपद विभागीय आयुक्तांच्या आदेशा नंतर पुन्हा रद्द करण्यात आले आया बाबत अधिक माहिती अशी खुलताबाद तालुक्यातील खिर्डी ग्रामपंचायतीचे सरपंच ज्ञानेश्वर मातकर यांचे पद बेकायदेशीर कामांमुळे विभागीय आयुक्त दिलीप गावंडे यांनी मंगळवारी दि.चार काढलेल्या आदेशाद्वारे अपात्र केले आहे. ज्ञानेश्वर मातकर

सरपंच यांनी, ग्रामसभेची मंजुरी न घेता निधीचा गैरवापर, झाडांची अवैधरीत्या कत्तल व लिलावाच्या रकमेत गैरव्यवहार, अपंग व आरओ वॉटर प्लांट योजनेसाठीच्या निधीचा अपहार, करणे संकलनात हलगर्जी पणा व ग्रामसभा न



घेणे असे आरोप सुनील घुसळे यांनी तक्रारीत लावले होते. या पूर्वीही ज्ञानेश्वर मातकर यांचे सरपंचपद रद्द झाले होते,मात्र अपील नामंजूर झाल्या नंतर.

गरव्यवहार,व वाटर प्ला योजनेसाठीच्या निधीचा अपहार, कर संकलनात हलगर्जीपणा व ग्रामसभा न घेणे असे आरोप सुनील घुसळे यांनी लावले होते. यापूर्वीही मातकर यांचे सरपंचपद रद्द झाले होते, मात्र अपील नामंजूर झाल्यानंतर फेरचौकशीत आरोप सिद्ध झाल्याने हा अंतिम निर्णय देण्यात आला.या प्रकरणात तक्रार अर्जदार सुनिल घुसळे यांच्या वतीने ॲड. शरद भागडे पाटील व ॲड. अयाज शेख यांनी बाजू मांडली.

विशेष म्हणजे खिर्डीचे माजी सरपंच कृष्णा चव्हाण यांनी तक्रारदार सुनील घुसळे. ॲड. शरद भागडे यांना गोड तोंड करून जंगी सत्कार केले यावेळी अनिल आव्हाड संतोष गुसिंगे यांचे सह आदी उपस्थित होते.

# जयतून बी शेख यांचे निधन



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील वेरूळ येथील जयतुन बी शेख ( वय ८० ) यांचे दुःखद निधन बुधवारी मध्य रात्रीच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले.

त्या शेख रहीम, शेख गुलामत, शेख सलीम आणि आ. सतीश चव्हाण यांचे समर्थक शेख रियाज यांच्या मातोश्री होत्या. वेरूळ येथील मुस्लिम कब्रस्तान येथे त्यांचा दफनविधी गुरुवारी सकाळी करण्यात आला

# कर्करोगाची लवकर ओळख झाल्याने यशस्वी उपचारांची शक्यता खुप वाढते - डॉ.अश्विनी घायसास

## जैन टॅग व महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटीतर्फे आयोजीत कॅन्सर उदबोधनास प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जैन टॅग व महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटी तर्फे कॅन्सर दिवसाचे औचित्य साधुन दिनांक ०४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता आयमी हॉल समर्थनगर येथे नाशिक येथील डॉ. अश्श्वीनी गायसास यांचे यांचे उदबोधन आयोजीत करण्यात आले होते. यावेळी डॉ.घायसास यांनी सांगीतले की, २०२० च्या जागीतक आकडेवारी नुसार कर्करोग हे भारतातील मृत्युचे एक प्रमुख कारण आहे. ज्यामुळे अंदाजे १० लाख मुत्यृ होतात भारतात दरवर्षी १५ लाखाहुन अधिक नविन कर्करोगाचे निदान होते आणि भविष्यात यामध्ये मोठया प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा आहे. कर्करोगाची लवकर ओळख झाल्याने यशस्वी उपचारांची शक्यता खुप वाढते, कर्करोग ओळखण्याचे २ घटक म्हणजे लवकर निदान आणि तपासणी हे आहे. लवकरात लवकर निदान लक्षणे असलेल्या रफ्णांना शोधण्यावर लक्ष केंद्रीत करते तर स्किनींग मध्ये कोणतीही लक्षणे दिसण्यापुर्वी कर्करोग असलेल्यांना ओळखण्यासाठीही निरोगी व्यक्तीची चाचणी करणे समाविष्ठ असते. बहुकर्करोग शोधण्यासाठी रक्त तपासणी हि काळाची गरज आहे. एकाच रक्त चाचणी मध्ये अनेक कर्करोग शोधणे शक्य आहे. अशी माहिती डॉ. गायसास यांनी दिली. यावेळी कार्यकमाचे



सुत्रसंचालन सारिका बडजाते, व सिमा बडजाते यांनी केले. यावेळी महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटीचे विर शैलेश चांदीवाल यांनी त्यांच्या केंद्राबददल माहिती व प्रस्तावना केली. यावेळी महावीर इंटरनॅशलच्या प्रार्थनाने कार्यकम ाची सुरफ्वात करण्यात आली. यावेळी कॅनकिडस चे विदयार्थी उपस्थित होते. त्यांना यावेळी व्हिल चेअर व अल्पोहार देण्यात आले. तसेच महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटी तर्फे २ एअर कुलर देण्यात आले. यावेळी कॅनकिडसचे संचालक विकास दराडे उपस्थित होते. कॅन किडसच्या विदयार्थ्याना आणण्यासाठी उज्वला पाटणी यांचे सहकार्य मिळाले. यावेळी न्या.कैलासचंद चांदीवाल, विर अनिल जैन, झोन चेअरमन महावीर इंटरनॅशलन विर विकास पाटणी, गव्हर्निग कॉन्सिर मेंबर ,महावीर इंटरनॅशलन मेट्रो सिटीचे माजी चेअरमन विर नरेश बोथरा, गुरफ परिवाराचे विजय चांदीवाल, पवन पाटणी, प्रमोद पाटणी, शितल बडजाते, राजेश कासलीवाल, सचिन लोहाडे, अनुज दगडा, नरेश बोथरा, अमित जैन, विकास पाटणी यांच्यासह जैन टॅगच्या अध्यक्षा श्श्वेता कासलीवाल, पुर्वा कासलीवाल, जयश्री लोहाडे, श्श्वेता गंगवाल, प्रोजेक्ट चेअरमेन दिपीका बडजाते, मोनिका चांदीवाल, रचना पहाडे, पुजा झांजरी, डॉ.याशिका पांडे, सिमा बडजाते, सारिका बडजाते व महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटीचे अध्यक्ष विर शैलेश चांदीवाल, सचिव विर अनंत जैस्वाल, कोषाध्यक्ष विर कमलेश सेठीया तसेच जैन टॅगच्या संस्थापिका अनुपमा दगडा, दिपीका बडजाते, जैन टॅगच्या रिचा कासलीवाल, सिम्मी पहाडे, श्श्वेता सेठी, दिपाली पांडे, स्वाती कासलीवाल, नेत्रजा कासलीवाल, पुजा सेठी, किर्ती पाटणी, उज्वला पाटणी, सपना पाटणी, मिताली काला, छाया कासलीवाल, रिना ठोले, महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटीचे सदस्य उपस्थित होते. अशी माहिती प्रसार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# अहिल्यानगरमधील ११ गड- किल्ले ३१ मेपर्यंत अतिक्रमणमूक्त करण्याची मोहीम

**अहिल्यानगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र व राज्य सरकारच्या पूरातत्व विभागाने संरक्षित केलेले १०९ गड-किल्ले महाराष्ट्रात आहेत. त्यातील ११ गड किल्ले अहिल्यानगर जिल्ह्यात आहेत. या गड-किल्लूयांवरील अतिक्रमणे ३१ मेपर्यंत हटवण्याचे आदेश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले आहेत. त्यासाठी या अतिक्रमणांचे सर्वेक्षण व माहिती संकलन संबंधित विभागांनी सुरू केले आहे.

अहिल्यानगर शहराजवळ ५२७ वर्षांपूर्वीचा निजामशाह कालीन भुईकोट किल्ला, यादवकालीन हरिश्चंद्रगड (अकोले), मराठ्यांनी मोगलांविरुध्द अखेरची लढाई जिंकलेला खर्डा किल्ला (जामखेड), संभाजी महाराजांना कैदेत ठेवलेला बहादूरगड (श्रीगोंदे), शिवाजी महाराजांनी जिंकलेला रतनगड, सह्याद्रीच्या डोंगररांगातील कुलंग, शिवाजी महाराजांनी विश्रांती घेतलेला पट्टा किल्ला (विश्रामगड, अकोले), महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखराजवळ असलेला कळसूबाई किल्ला, अलंग किल्ला, गिर्यारोहण्यासाठी प्रसिद्ध मदन किल्ला, कावनई किल्ला असे ११ किल्ले सध्या केंद्र व राज्य सरकारचा पुरातत्व विभाग व वन विभागाच्या ताब्यात आहेत.

याशिवाय आणखी काही संरक्षित वास्तू विविध विभागांच्या ताब्यात आहेत. त्याची माहिती तसेच तेथील अतिक्रमणांच्या माहितीचे संकलन सुरू करण्यात आले आहे.

गड- किल्लूयांच्या परिसरातील अतिक्रमणे हटवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची पहिली बैठक अहिल्यानगरमध्ये झाली. यावेळी ३१ मेपर्यंत सर्व अतिक्रमणे हटवण्याचे आदेश देण्यात आले. त्यासाठी सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

अतिक्रमणे हटवण्याबरोबरच लोकसहभाग, स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून तेथे स्वच्छता मोहिम राबवली जाणार आहे तसेच पर्यटकांच्या दृष्टीने सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती महसुल विभागाचे तहसीलदार रवींद्र सबनीस यांनी दिली.

# प्रहार दिव्यांग संघटनेचे शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर पिंडदान आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिव्यांग व्यक्तीची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे, स्वतंत्र घरकुल योजना राबविली पाहिजे, त्यांना राजकीय आरक्षण मिळाले पाहिजे या मुख्य मागणीसाठी शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालया वरती प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने संवेदनशील सरकारचे पिंडदान आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती माजी मंत्री तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी दिली.

२७ जानेवारी रोजी कन्नड तालुक्यातील त्रिंबक धोत्रे या दिव्यांगाने सुसाईड नोट लिहून व ध्वनीफीत जाहीर करत दिव्यांगांच्या योजनांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत पैठणच्या जायकवाडी धरणात उडी घेऊन आत्महत्या केली होती.

दिव्यांगांच्या विविध योजना व समस्या बाबत बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली प्रहार संघटनेने राज्यभर अनेक आंदोलने केली. परंतु महाराष्ट्र शासनाने दखल न घेतल्यामुळेच दिव्यांग त्रिंबक धोत्रे यांना आत्महत्या सारखे पाऊल उचलावे लागले. शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी त्रिंबक धोत्रे यांचा तेरावा असल्याने या निमित्ताने त्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी, घरकुल योजनेचा लाभ मिळावा, अंतोदय योजनेचा लाभ मिळावा यासह राज्यस्तरीय मागण्याबाबत गांधी पुतळा शहागंज ते छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयावर असंवेदनशील सरकारचे पिंडदान आंदोलन करण्यात येणार आहे.

माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी दुपारी बारा वाजता गांधी पुतळा शहागंज येथून या मोर्चाला सुरुवात होणार असून दुपारी दोन वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर पिंडदान आंदोलन करण्यात येणार आहे.

यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे राज्य अध्यक्ष धर्मेंद्र सातव, राज्य संपर्कप्रमुख रामदास खोत, राज्यसचिव सुरेश मोकल, राज्य उपाध्यक्ष शिवाजी गाडे, लक्ष्मी ताई देशमुख, संजीवनी बारंगुळे, कविता पवार, सुरेखा ढवळे, लक्ष्मण पोकळे, देवदत्त माने, दत्ता भोसले, मयूर काकडे, मोहन मुंडे, रघुनाथ तोंडे हे या आंदोलनाला मार्गदर्शन करणार आहेत.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील आंदोलन यशस्वी करण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर शिंदे, शहर प्रमुख कुणाल राऊत, जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे, जिल्हा संपर्कप्रमुख पारसचंद साकला, जिल्हा सचिव ज्योतीराम जाधव, तालुका अध्यक्ष राजेश जयस्वाल, सचिन गवई, कीर्ती देशपांडे, कन्नड अध्यक्ष गणेश नलावडे, संजय मिसाळ, युसुफ पटेल खुलताबाद, दादासाहेब पाचपुते गंगापूर, गोविंद आप्पा डांगे पैठण, नरसिंग ठुबे वैजापूर, सुनिता खरात, विजया वाणी, वंदना मुळे, शांताराम बनकर सिल्लोड, संदीप इंगळे सोयगाव, दत्ताभाऊ साळकर, सुनील हुस्के पाटील, युवराज पाटील हे परिश्रम घेत आहेत..

# आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया पारदर्शक; गैरप्रकार आढळल्यास तक्रार नोंदविण्याचे आवाहन

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२(१) (सी) नुसार आरटीई २५ टक्के प्रवेश वंचित व दुर्बल घटकातील मुला, मुलींसाठी राखीव ठेवण्याची तरतुद आहे. यानियमान्वये होणाऱ्या प्रवेश प्रक्रिया या पारदर्शक व मानवी हस्तक्षेपाशिवाय होतात. त्यामुळे यासंदर्भात कुणी प्रलोभन दिल्याचे प्रकार निदर्शनास आल्यास तक्रार नोंदविण्याचे आवाहन शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी केले आहे.

आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक प्रक्रिया असून या प्रक्रियेत लॉटरी पद्धतीने सोडत काढून प्रवेश पात्र लाभार्थी व प्रतिक्षाधिन लाभार्थी यांची शाळानिहाय यादी घोषित केली जाते.यामध्ये कोणत्याही प्रकरचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये असे आवाहन शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी केले आहे.

अशा प्रकारचे गैरप्रकार आपल्या निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका संबंधित विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे demh2@gmail.com आयुक्त शिक्षण पुणे educommoffice@gmail.com यांचेकडे ई-मेलद्वारे अथवा समक्ष आपली तक्रार पुराव्यासह नोंदवावी. यासंदर्भात कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर नियमानुसार फौजदार स्वरुपाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्राथमिक शिक्षण संचालनालाय शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी केले आहे.

# १0वी, १२ वी कॉपीमुक्त परीक्षा; मनाई आदेश, भरारी पथकांची नियुक्ती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता १० व व १२ वी च्या परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च याकालावधीत होणार आहेत. परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडाव्या यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी मनाई आदेश जारी केले असून भरारी पथकांच्या नियुक्तीचे आदेशही दिले आहेत.

परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्र परिसरात व त्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्र परिसराच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी मनाई आदेश जारी केले आहेत. त्यानुसार परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात परीक्षार्थी, परीक्षेसाठी नेमलेले कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी वगळून अन्य कुणाही व्यक्तिस प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र परिसरात पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तिंना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. १०० मीटर परिसरात झेरॉक्स दुकाने सुरु ठेवण्यास, सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी बुथ, आयएसडी बुथ, फॅक्स केंद्र, मोबाईल, वायरलेस सेट, ट्रान्झिस्टर, रेडीओ, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप इ. जवळ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. हे आदेश दि.११ फेब्रुवारी ते दि.१८ मार्च या कालावधीत अंमलात राहतील असे कळविण्यात आले आहे.

## भरारी पथके नियुक्त

या परीक्षा कालावधीत जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त वर्ग १ अधिकाऱ्यांची भरारी पथके नियुक्त करण्याचे आदेशही अपर जिल्हा दंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत. त्यानुसार प्रत्येक तालुक्यात तहसिलदारांच्या नेतृत्वात भरारी पथके नियुक्त करण्यात आले आहेत. एका पथका किमान चार सदस्य असतील व एक सदस्य महिला असेल. त्याच प्रमाणे प्रत्येक परीक्षा केंद्रावर एक बैठे पथकही नियुक्त असेल व त्यातही एक सदस्य महिला असेल. परीक्षा सुरळीत होण्याच्या दृष्टीने कारवाई करावी,असे निर्देश देण्यात आलेत.

# वाहनांच्या नंबर प्लेटबाबत सुचना

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस HSRP(High Security Registration Plates) बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व वाहनाधारकांना त्यांच्या वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविण्याकरीता प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे यांनी सुचना जारी केल्या आहेत.

१. वाहनांना नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना HSRP आवश्यक असून सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देशही देण्यात आले आहे.

२. जिल्ह्याकरीता M/s Real Mazon India Ltd ही एजन्सी निश्चित करण्यात आलेली असून कडठझ नंबर प्लेट बसविण्याकरीता बुकींग पोर्टल htts://maharashtrahsr.com हे पोर्टल निश्चित करण्यात आले आहे.

३. वाहनधारकांनी वरील पोर्टलवर बुकींग करुन त्यांच्या सोईप्रमाणे वेळे घेऊन कडठझ बसवून घेण्यात यावी.

४. वाहनधारक जिल्ह्यातील कार्यालयातील नोंदणी धारक नसला तरी काही कामानिमित्त जिल्ह्यात वाहनधारक वाहन वापरत असेल तरीदेखील या वाहनास कडठझ नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे.

५. H$SRP नंबर प्लेट बसविण्याकरीता पुढीलप्रमाणे शुल्क जीएसटी वगळून आकारण्यात येणार आहे.

दुचाकी / ट्रक्टर शुल्क ४५० रु., तीन चाकी ५०० रु., इतर सर्व वाहने ७४५ रु.

६. वाहनधारकांना त्यांच्या वाहनावर H$S>R>P नंबरप्लेट बसविण्या संदर्भात काही तक्रार असल्यास संबंधित सेवापुरवठाधारकाच्या पोर्टलवर तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे तक्रार दाखल करु शकतात.

७. जिल्ह्यातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, त्यांच्या वाहनावर कडठझ नंबरप्लेट न बसवल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे व उतरविणे दुय्यम प्रत, विमा अद्ययावत करणे इ. कामकाज थांबविण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी.

८. याद्वारे HSRP नंबर प्लेट वाहने बनावट HSRP नंबर प्लेट असलेली वाहने इ. वाहनांवर कार्यालयाकडून भविष्यात दंडात्मक कारवाई करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी.

असे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे यांनी कळविले आहे.

# ब्राह्मणवाद प्रभावी ठरला कीं हुकूमशाहीकडे वाटचाल होते - राजू परुळेकर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवगिरी महाविद्यालयात फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचे हे ३४ वे वर्ष आहे. दिनांक ६, फेब्रुवारी २०२५ रोजी प्रख्यात पत्रकार व विचारवंत मा. राजू परुळेकर (मुंबई) यांनी व्याख्यानमालेचे उद्धाटन करून 'बहुजानांचे सांस्कृतिक व राजकीय भान' या विषयावर पहिले पुष्प गुंफले. या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार मा. जयंत महाजन (छत्रपती संभाजीनगर) हे होते. प्रमुख उपस्थिती मा. श्री. पंडितराव हर्षे यांची होती.

या व्याखानमालेचे पहिले पुष्प गुंफताना पत्रकार राजू परुळेकर म्हणाले की, महाराष्ट्र हा पुरोगामी की काही पुरोगामी महामानव असलेले राज्य आहे? हा चिंतनाचा विषय आहे. ब्राह्मणवाद प्रभावी ठरला कीं हुकूमशाहीकडे वाटचाल होते. दुर्दैवाने आज बहुजन समाजाचे ब्राम्हणीकरन होत आहे. बहुजन विचारधारा म्हणजे 'माणसाने माणसाला माणसाप्रमाणे वागवावे' हे आहे. साताऱ्यात बहुजनांचे नायक डॉ. आ. ह. साळुंखे असतांना बहुजनांची मुलं चुकीच्या मार्गाला लागली आहेत. हा बहुजन विचारधारेचा अपमान नाही का? बहुजन ब्राम्हणवादी होत आहेत. कारण त्यांच्या प्रमुखांना आपल्या जहागिऱ्या वाचवायच्या आहेत. हे पूर्वपार सुरु आहे. अपवाद शिवरायांचा काळ आहे. कारण हे सर्व शिवरायांनी मोडून काढले. पुरोगामी विचारांच्या लोकांना ट्रोल करणाऱ्यांची यादी पहा. सर्व बहुजन दिसतील. कारण ब्राम्हण या मागचे सूत्रधार असतात. आर.एस.एस. ला फक्त 'हे राम' माहिती आहे. ते गांधींच्या हत्येला 'वध' म्हणतात. 'नो बिंदी नो बिझनेस' हा आर.एस.एस. चा फंडा आहे. आपणही टिळा लावायला सुरुवात केली. शिवरायांचा पराक्रम नाकारणाऱ्यांची जयंती बहुजन करत आहेत. पटेलांनी आर.एस.एस. वर घातलेली बंदी लोकशाहीच्या नावाखाली नेहरूनी उठवली नसती तर, आजचे आर.एस.एस. चे हे रूप आपणास पाहावयास मिळाले नसते. 'माणूस मरतो विचार संपत नसतात' असे म्हणतात. पण, आर.एस.एस. ने हे सिद्ध केले कीं, 'माणूस मारला कीं त्याचा विचारही संपतो' उदा - दाभोळकर मारले त्यांची चळवळ थांबली. महाविकास आघाडी सरकार असतांना डॉ. आ. ह. साळुंखे यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार द्या मागणी होती, नाही दिला. महायुतीच सरकार आल्यावर हा पुरस्कार कोणाला दिला? समजून घ्या.

रामाचे नाव घेता मग बारा भानगडी करून राज्य का मिळवत आहात? राष्ट्रपती आदिवासी आहेत म्हणून मंदिरात प्रवेश नाकारता मग आमची मुंज करा पण ते मुंज करण्यास तयार झाले तर तुम्ही नाकारा. शिवराय, शाहू, आंबेडकर यांच्या सोबतही ब्राह्मण होते असे काही लोक सांगतात खरे आहे पण ब्राम्हण सतत बलवानासोबत राहतात. हिटलर जिंकण्याची शक्यता वाटताच पुण्यात जर्मन भाषेचे क्लास निघाले होते.

संधी मिळाली कीं स्वार होतात परधर्माचा द्वेष करून बहूजणांना अंकित करणे हे ब्राह्मणी धर्माचे मुख्य सूत्र आहे. गेली अकरा वर्षे तुम्ही गुलामागिरीत आहात राजकीय सत्तेमार्फत हा फास अजून जास्तच आवळला जाणार आहे. याला जिम्मेदार ब्राह्मण नसून त्यांना साथ देणारे बहुजन आहेत. शिवरायांची आरती करण्यापेक्षा त्यांचे विचार, कार्य समजून घ्या. आज गावोगाव जे शिवव्याख्याते फिरत आहेत यांना जरा आवरा. आपलं नातं माणूस म्हणून आहे ते तसेच राहू द्या. आपले वर्तमान आणि भविष्य शोषकांच्या हाती जाऊ देऊ नका. स्वातंत्र्य तुम्हांला कोणीच देऊ शकत नाही. ते स्वतःच मिळवावे लागते ते मिळवा. या व्याख्यानमालेचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर म्हणाले की, संत परंपरेतून महाराष्ट्र घडला आहे. महाराष्ट्रातील वैचारिक सुधारणाही समतेच्या वाटेने जाणारी असून फुले-शाहू-आंबेडकरांचे यात मोठे योगदान राहिले आहे. या व्याख्यानमालेचे अध्यक्षीय समारोप प्रसंगी जेष्ठ पत्रकार मा. जयंत महाजन म्हणाले की, बहुजन समाजातील तरुणांनी आपला सांस्कृतिक वारसा जोपासला पाहिजे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक तथा उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते यांनी केले.

या व्याख्यानमालेसाठी शहरातील साहित्यिक, विचारवंत, पत्रकार, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच सामाजिक व राजकीय चळवळीतील सर्व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आमदार सतीश चव्हाण आणि देवगिरी महाविद्यालय विकास समितीचे जेष्ठ सदस्य मा.पंडितराव हर्षे यांचे मार्गदर्शनाखाली ही व्याख्यानमाला यशस्वीपणे संपन्न झाली आहे.

व्याख्यानमालेचे संयोजक प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, समन्वयक तथा उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, प्रा. नंदकुमार गायकवाड, प्रा.सुरेश लिपाने, प्रा. विजय नलावडे व संयोजन समिती यासाठी कार्यरत होती.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816